## वॉरियर तायक्वांदो अकादमी
योद्धा बना, चिंता सोडा!
तज्ज्ञ ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण
आजच जॉईन करा



शाखा : जुईनगर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे
9821143012 @warriortaekwondoacademy



दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३६२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१२ ऑगस्ट २०२५



**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**


# पुण्यात भीषण अपघात, ७ महिलांचा मृत्यू...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, पुणे :** पुण्यातील खेड तालुक्यात एक भीषण अपघात झाला आहे. कुंडेश्वरला दर्शनाला जाणाऱ्या महिलांच्या गाडीचा अपघात झाला आहे. या अपघातात ७ महिला भाविकांचा मृत्यू झाला असून ३० ते ३५ जण जखमी झाले आहेत. हा अपघात खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील कुंडेश्वर शिव मंदिराकडे जाताना घाट परिसरात घडली आहे.

पापळवाडी येथील काही महिला दर्शनसाठी कुंडेश्वर येथे जात असताना, घाटातून प्रवास करताना त्यांची गाडी दरीत पलटी झाली. अपघातात ७ महिलांचा मृत्यू झाला आहे. तर अन्य ३० ते ३५ महिला जखमी झाल्या आहेत.



त्यांना तातडीने पाईट येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अधिक माहितीसाठी खेड पोलीस स्टेशनकडून तपास सुरु आहे. या दुर्दैवी घटनेनं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**नेमका अपघात कसा झाला?**

खेड तालुक्यातील कुंडेश्वर येथे दर्शनाला जात असताना, नागमोडी वळणावर घाट चढताना गाडी रिटर्न आल्याने महिला भाविकांची पिकअप जीप पलटली. या पिकअपने ५ ते ६ पलटी खाल्ल्यानंतर ती रस्त्याच्या कडेला खाली कोसळली. या पिकअपमधून प्रवास करणाऱ्या त्यातील २५ ते ३० महिला भाविकांपैकी ७ महिलांचा मृत्यू झाला आहे. तर इतर महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती असून जखमींना जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

## अन्न व औषध प्रशासनामार्फत सणासुदीच्या पार्श्वभूमीवर विशेष तपासणी मोहीम



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलडाणा :** सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्यभर सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षेचा या टॅगलाईनखाली अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष तपासणी मोहीम सुरू झाली आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार सोमवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोज बुलडाण्यात मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.उद्घाटनाच्या दिवशी श्री गणेश बिग्गाजी बिकानेर स्वीट मार्ट, जुना अजीसपुर रोड, सागवण, बुलडाणा येथे तपासणी करून वैध अन्न परवाना नसल्याचे आढळले. संबंधित आस्थापनास परवाना मिळेपर्यंत व्यवसाय बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे. यावेळी सहाय्यक आयुक्त (अन्न) पी.एस.पाटील, पोलीस उपाधीक्षक (गृह) बी.डी.पावरा, सहकार अधिकारी एम.ए.पोले, अन्नसुरक्षा अधिकारी नि.म.नवलकार व जी.के.वसावे तसेच पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी मोरे उपस्थित होते.अन्न व्यवसाय चालकांना वैध परवाना घेणे, स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळणे, ताज्या व परवानाधारक विक्रेत्याकडूनच कच्चा माल घेणे, दुग्धजन्य पदार्थ ४ओउ पेक्षा कमी तापमानात साठवणे आणि जुना किंवा खराब खवा/मावा टाळणे यासारख्या महत्त्वाच्या सूचना विशेष तपासणी मोहिमेदरम्यान देण्यात आल्या. सणासुदीत नागरिकांना शुद्ध, सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ पुरवावेत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने सर्व अन्न व्यवसाय चालकांना केले. तसेच नियमाचे पालन न करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली लातूर जिल्ह्यातील विकास कामांसंदर्भात आढावा बैठक संपन्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, लातूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक ११ ऑगस्ट २०२५ रोजी लातूर येथे जिल्ह्यातील विकास कामांसंदर्भात आढावा बैठक पार पडली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी लातूरमध्ये उभारण्यात आलेल्या रेल्वे बोगी कारखान्यामध्ये स्थानिक युवक-युवतींना रोजगार मिळावा यासाठी स्पष्ट निर्देश दिले.

लवकरच या कारखान्यात वंदे भारत रेल्वेच्या बोगींचे उत्पादन सुरू होणार असून, सुमारे १०,००० रोजगार निर्माण होतील.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, या रोजगारासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी जिल्ह्यातील आयटीआय आणि पॉलिटेक्निक संस्थांमध्ये गरजेचे ट्रेड्स (अभ्यासक्रम) सुरू केले जातील आणि युवकांना प्रशिक्षण दिले जाईल. यासाठी राज्य सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल. तसेच, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला रेल्वेची जागा हस्तांतरित करण्यासाठी रेल्वे प्रशासनासोबत बैठक घेऊन समन्वयाने तोडगा काढला जाईल.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत लातूर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना, जिल्हा रुग्णालय, जुने सिंचन प्रकल्प, तसेच उदगीर येथील शासकीय दूध भुकटी प्रकल्पाच्या पुनरुज्जीवनाचा यावेळी आढावा घेण्यात



आला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मदर डेअरीच्या सहकार्याने दूध भुकटी प्रकल्प पुन्हा सुरू करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. सिंचन क्षमता वाढवण्यासाठी घरणी, तिरू आणि देवर्जन प्रकल्पांतून जलवाहिनीद्वारे पाणी वितरणाची उपयुक्तता तपासून प्रस्ताव सादर करण्याचे सांगण्यात आले. हाडगा आणि मसलगा सिंचन प्रकल्पांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर देण्यात आला. काही पांदण रस्त्यांवर अडथळा निर्माण करणारे विद्युत खांब तात्काळ हटवण्याचे निर्देश ही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

## कल्याण फाटा ते लोढा पर्यंत पथ दिवे ३ -४ महिन्यापासून बंद



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.११, शिळफाटा (ठाणे) :** कल्याण फाटा ते लोढा पर्यंत ३ -४ महिन्यापासून पद दिवे बंद आहेत. त्यामुळे वाहन चालकांना रात्री नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांनी अनेक तक्रारी देऊन सुद्धा प्रशासनाने त्याची दखल घेत नाही. आता तरी प्रशासन जागे होऊन बंद असलेले पद दिवे चालू करणार का? असे भारतीय जनता पार्टीचे मोर्चा अध्यक्ष साहिल बाळाराम पाटील यांनी आमच्या पत्रकार विनोद वास्कर यांना प्रतिक्रिया दिली आहे. नागरिकांना होणाऱ्या तासापासून प्रशासनाने लवकरात लवकर दखल घेऊन दिलासा द्यावा. नागरिक या मार्गावर आपला जीव मुठीत धरून प्रवास करत आहे. जर एखाद्या नागरिकाला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागले तर त्याला जबाबदार कोण ? असाही सवाल साहिल पाटील यांनी उपस्थित केला.

## पनवेल शहर पोलीस स्टेशनची धडाकेबाज कामगिरी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, पनवेल :** शेतातून गुप्तधन काढून देतो असे सांगून ३९ लाख ७० हजार रूपयांचे दागिने व रोख रक्कमेची फसवणुक करणाऱ्या भोंदूबाबा ला अटक करून संपूर्ण मुद्देमालाची रिकव्हरी केली. तसेच इतर ३७ असे एकुण ३८ गुन्ह्यांची उकल करून उल्लेखनीय कामगिरी करून पनवेल शहर पोलीस ठाणे टीमने धडाकेबाज कामगिरी केली आहे.

१. शेतातील गुप्तधन काढून देण्याच्या बहाण्याने पनवेल येथील एका कुटुंबाचे ३९ लाख ७० हजार रूपये किंमतीचे सोने व रोख रक्कमेची फसवणुक करणाऱ्या भोंदुबाबा विरूध्द पनवेल शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ४३३/२०२५ जादूटोणा ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल होताच पनवेल शहर पोलीसांनी नमूद भोंदुबाबाला हुपरी, जि. कोल्हापुर येथुन ताब्यात घेऊन त्याच्याकडे सखोल तपास करून फसवणुक केलेल्या सर्व सोन्याच्या दागिन्याची व रोख रक्कमेची संपुर्ण ३९ लाख ७० हजार रुपयांचे दागिने व रकमेची रिकव्हरी केली.

२. तसेच पनवेल शहर पोलीस ठाणेकडील गु.र.नं. १७८/२०२५ मधील आरोपी त्याचे मूळ गावी ओडीसा या ठिकाणी जाऊन लपून बसला होता. आरोपीचे गाव पुराने वेढलेले असतांना देखील पनवेल शहर पोलीस तपास पथकाने फायर ब्रिगेडच्या मदतीने डिंगीने पाण्यातुन ८ कि.मी. आत जावून सदर आरोपीत यास अटक करून त्याचेकडुन चोरी केलेले ७ लाख २४ हजार रूपये किमतीचे ५ आयफोन मोबाईल जप्त केले.

३. पनवेल बस स्थानक परिसरातील प्रवाश्यांना चार चाकी वाहनात लिफ्ट देण्याच्या बहाण्याने बसवुन मारहाण करून धमकी देऊन त्यांच्याकडील किंमती मुद्देमाल जबरस्तीने काढून घेणाऱ्या टोळीस अटक करून २ लाख २७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

४. पनवेल रेल्वे स्थानक परिसरातील प्रवाशांच्या




पाठीमागून येवुन दुखापत करण्याची भिती घालून, त्यांच्या हातातील रोख रक्कम असलेली सँग बॅग जबरी चोरी करून सफेद रंगाच्या कार मधुन पसार होणाऱ्या टोळीतील ५ आरोपीतांना अटक करून २ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ११ लाख ६७ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

५. नवी मुंबई परिसरातील मोबाईल दुकानाचे शटर उचकटवून मोबाईल चोरी करणाऱ्या टोळीस ताब्यात घेवून ४ लाख ९५ हजार ८१० रूपये एकुण किंमतीचे ४५ मोबाईल हस्तगत करून ०४ गुन्हे उघडकीस आणले.

६. पनवेल शहर पोलीसांनी वाहन चोरीचे ३ आरोपींना अटक करून ८ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

७. जबरी चोरीच्या १० आरोपींना अटक करून ०६ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

८. घरफोडीमधील ७ आरोपींना अटक करून ८ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

९. इतर चोरी मधील १७ आरोपींना अटक करून ७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१०. फसवणुकीच्या गुन्हयातील ३ आरोपींना अटक करून ५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

११. आयटी ॲक्ट गुन्ह्यातील ९ आरोपींना अटक करून २ गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्याचप्रमाणे एनडीपीएस गुन्ह्यातील २ आरोपींना अटक करून १ गुन्हा उघडकीस आणुन १ लाख ५ हजार रुपये किंमतीचा हेरॉईन हा अंमली पदार्थ जप्त केलेला आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्याची सातत्यपूर्ण धडाकेबाज कामगिरी चालू असून केवळ जुलै महिन्यात ५७ आरोपींना अटक करून चोरी, जबरी चोरी, घरफोडी व फसवणुक असे महत्वपुर्ण ३८ गुन्हे उघडकीस आणून अंदाजे ७१ लाख रूपये पेक्षा अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त केलेला आहे. सदरची कार्यवाही पोलीस आयुक्त, नवी मुंबई मिलींद भारंबे, पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपआयुक्त प्रशांत मोहिते, परिमंडळ ०३, पनवेल, सहा. पोलीस आयुक्त भाउसाहेब ढोले, पनवेल विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शाकीर पटेल, पोलीस निरीक्षक (प्रशासन) अभिजित अभंग, सपोनि/ प्रविण फरतडे, सपोनि/ राजेंद्र घेवडेकर, पोउपनि/विनोद लभडे,

पोउपनि/ हजरत पठाण, पोउपनि/अभय कदम, पोहवा/ १३७८ अविनाश गंथडे, पोहवा/११०६ धिरज थवई, पोहवा/ २०६८ परेश म्हात्रे, पोहवा/ १८५१ वायकर, पोहवा/११२३ दिवेकर, पोहवा/ २१०३ तुषार बोरसे, पोहवा/ २००२ सुर्यकांत कुडावकर, पोहवा/२०३५ अभयसिंह पाटील, पोहवा/ २०६७ शैलेश जाधव, पोहवा/ २२२८ अमोल पाटील, पोहवा/२२४२ माधव शेवाळे, पोहवा/ २३२६ संदेश म्हात्रे, पोना/ २७०५ रविंद्र पारधी, पोना/ २८३१ विनोद देशमुख, पोना/ २८६३ मेथे, पोना/ ३२९५ मिथुन भोसले, पोना/ ३२९० सम्राट डाकी, पोशि/ ३०७० शशिकांत काकडे, पोशि/१२११८ विद्याधर गायकवाड, पोशि/ ३७०५ धर्मेश म्हात्रे, पोशि/ ३७२७ चंद्रशेखर चौधरी, पोशि/ ३६२५ अभय मेन्या, पोशि/ ३७३३ विशाल दुधे, पोशि/ ४०३३ किरण कराड, पोशि/ ४१२९ साईनाथ मोकल यांनी केली आहे.

## मालमत्ता कर माफ करण्यासाठी पनवेल मनपा वर धडक मोर्चा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, पनवेल :** शेतकरी कामगार पक्ष (शेकाप), काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शप गट), शिवसेना (उबाठा गट), महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे), बहुजन समाज पार्टी (बीएसपी), आम आदमी पार्टी (आप), समाजवादी पार्टी (एसपी), महाविकास आघाडीचे घटक पक्ष पनवेल तालुका प्रकल्पग्रस्त संघर्ष समिती व सामाजिक संघटना आणि विविध फोरम यांनी संयुक्तपणे पनवेल महानगरपालिकेवर पोल खोल धडक मोर्चाचे आयोजन केलेले आहे. सदर मोर्चा बुधवार दिनांक १३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक (ओल्ड पनवेल) येथून सुरू होऊन पनवेल महानगरपालिका कार्यालय येथे जाणार आहे. पनवेल महानगरपालिकेने 'शास्ती' म्हणजेच मालमत्ता करा वरील दंड किंवा व्याज माफ करीत आहोत नागरिकांनी आपला मालमत्ता कर भरावा असे आवाहन केले आहे. मालमत्ता कर न भरल्यास त्यावर कारवाई करण्याचे निर्देश पनवेल महानगरपालिकेने दिले आहेत. पनवेल महानगरपालिका शास्ती वर माफी देऊन जनतेची दिशाभूल करीत आहे, असे नागरिकांचे म्हणणे असून शास्ती नव्हे तर मालमत्ता कर माफ करावा अशी मागणी पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील रहिवासी नागरिक तसेच व्यापारी वर्गही करीत आहे.

## संपादकीय



### हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिवस म्हणून साजरा केला जातो. जगभरात हत्तींची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. त्वचा आणि हस्तिदंती वस्तुंसाठी तस्करांकडून हत्तींची मोठ्या प्रमणात शिकार केली जाते. एका अंदाजानुसार दररोज अवैध शिकारीमध्ये किमान १०० हत्ती मारले जातात म्हणून वर्ल्ड एलीफंट फाऊंडेशनने २०११ सालापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्ती दिवस अर्थात वर्ल्ड एलीफंट डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

या दिवसाचे औचित्य साधून हत्तीचे पर्यावरणीय तसेच जीवशास्त्रीय महत्व याविषयी जनजागृती करण्यात येते. जगभरात आफ्रिका आणि आशियायी देशात हत्तींची संख्या सर्वाधिक आहे. जगातील ९० टक्के हत्ती या दोन खंडातच आढळतात पण आता या दोन खंडातही हत्तींचे प्रमाण घटू लागले आहे. अवैध शिकारींवर जर वेळीच अंकुश लावला नाही तर पृथ्वीवरून हत्ती नामशेष होऊ शकतात आणि जर पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर त्याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होऊ शकतो. पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली आहे.

हत्ती कमी झाल्यास निर्माण होणाऱ्या धोक्यासंदर्भात सेंट लुईस विद्यापीठातील संशोधकांनी केलेले संशोधन नेचर जिओ सायन्स या नियतकालिकेत छापून आले होते. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर जगभरातील पर्यावरण व वन्यजीवप्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम हाती घेतली. जगभरात ही मोहीम आता जोर धरू लागली आहे. पृथ्वीवरील सर्वात महाकाय व सर्वात बलवान शाकाहारी प्राणी म्हणून हत्तीची गणना होते. हत्तीच्या प्रचंड वजनदार आकारमानामुळे जंगलात एकप्रकारे ते बुलडोझरचे काम करतात. त्यांच्या या चालण्यामुळे ते जंगलात नव्या वाटा निर्माण करतात. गवत व विविध वृक्ष वेलिंच्या परागीभवनात हत्तींच्या हालचालींचा मोठा वाटा असतो. ते गवत तुडवतात. विविध जातींच्या झाडांची फळे आणि पाने खातात. काही वेळा ते जंगलातील वठलेली झाडे धक्का देऊन पाडतात. या सगळ्यांच्या त्या जंगलाच्या वनक्षेत्राच्या इकोसिस्टीमवर परिणाम होत असतो.

हत्ती जंगलात असल्यामुळे झाडांची संख्या नियंत्रणात राहते. जंगलात वेगाने वाढणाऱ्या वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत असतात. विशेषतः आफ्रिकेतील हत्तींबाबत करण्यात आलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की हत्ती अशा वेगाने वाढत असलेल्या वनस्पतींची पाने खात असल्याने वातावरणात सोडण्यात येणारा कार्बन डायऑक्साइड कमी प्रमणात सोडला जातो. मध्य आफ्रिकेतील कांगो प्रजासत्ताकाच्या अख्यातीरित येत असलेल्या जंगलात याबाबत संशोधन केले असता वरील निष्कर्ष संशोधकांनी काढले आहे. त्यामुळे हत्तींची संख्या वाढत राहिली तरच वातावरणातील प्राणवायू टिकून राहील आणि कार्बनचे प्रमाण कमी होईल हे जाणूनच पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम सुरू केली आहे.

हत्ती वाचवणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सर्व देशांनी सहभाग नोंदवायला हवा. पर्यावरण वाचवायचे असेल आणि वातावरणातील कार्बनचे प्रमण कमी करायचे असेल तर हत्तींची अवैध शिकार रोखली पाहिजे. हत्तींची शिकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. हत्ती वाचेल तरच वातावरण वाचेल, पर्यावरण वाचेल. हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा.

# युवाशक्तिचे हाती प्रगतीचे सुकाणू

आज एकूण राजकीय परिस्थिती बघितली तर सैरभैर झालेली आहे. सत्तेसाठी राजकारण कसे सुरु आहे हे आपण बघतच आहे. आणि त्यात महत्त्वाचे प्रश्न जसे बेरोजगारी, वाढती व्यसनाधीनता हा युवकांसमोरचा महत्त्वाचा प्रश्न आहे. तो मात्र बाजूला पडत आहे. जसे शिक्षित युवक आहे. त्यासमोर नोकरीचा प्रश्न आहे तसेच जो शिक्षित नाही. परंतु शेती या फार मोठ्या व्यवसायात गुंतलेला आहे त्याच्या डोळ्यासमोर शेती पिकवणे आणि ती टिकवून ठेवणे यातच तो गुरफटला आहे, त्याचीही अनेक प्रश्न आहे ते सुद्धा बऱ्याच अंशी दुर्लक्षित राहतात.

आपण म्हणतो देशाच्या प्रगतीचे सुकाणू युवकांच्या हाती आहे असे म्हटले जाते. भारत हा जगातील सगळ्यात मोठा तरुणांचा–युवकांचा देश आहे.भारतात पासष्ट टक्के युवकांची संख्या आहे, असे म्हटले जाते. युवापिढीचे क्षमतेवर, ताकतीवर भारतही जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पहात आहे. आजच्या परिस्थितीत काही ठरावीक युवा पिढीत नवीन शिकण्याची आवड आहे, जिद्दही आहे. देशाच्या विकासात त्यांचा सहभाग आहे.आज देशाच्या सीमेवर जाऊन आपल्या देशाच्या रक्षण करणारा देशभरातील युवकच आहे.त्याचा आपल्याला सार्थ अभिमान आहे.

जागतिक स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवसम्हणून साजरा केला जातो. युवकांशी निगडीत काही विषयावर चर्चा घडवून आणली जाते.

लिब्सन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ मध्ये पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या परिषदेत १२ ऑगस्ट जागतिक युवा दिवस साजरा करण्याची शिफारस केली गेली.आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक युवा दिवस म्हणून साजरा होतो.

युवा दिवस साजरा करत असताना युवकांशी निगडीत काही, विषय/प्रश्नांची शासकिय आणि युवा पातळीवर चर्चा होणे आवश्यक वाटते.

- ❊ **युवक आणि विद्यार्थि संघटना.**
- ❊ **युवक आणि राजकीय संघटना**
- ❊ **युवक आणि सोशल मिडिया.**
- ❊ **युवक आणि राजकारण.**
- ❊ **युवक आणि सामाजिक जाणिवा, जबाबदारी.**
- ❊ **युवक आणि शेतीव्यवसाय.**

या संबंधित प्रश्न जाणून घ्यायला हवेत. महाविद्यालयीन स्तरीय युवकांच्या विद्यार्थी संघटना आहेत. एकेका महाविद्यालयात दोन/तिन/चार अशा संघटना बघायला मिळतात. ह्या संघटना कुठल्या ना कुठल्या पक्षाच्या अधिपत्याखाली कार्य करत असतात. त्यामुळेच पक्षापक्षातील मतभेद ह्याच्यातही पहायला मिळतात. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवणे, अँडमिशन मधला, मग तो महविद्यालय, होस्टेलमध्ये अँडमिशन, जादा फीस आकारणी कडे लक्ष देऊन विद्यार्थी वर्गाला न्याय मिळवून देणे हे महत्वाचे काम संघटनेचे आहे. पण ह्यांचा अधिकतर वेळ वादातच जातो, बऱ्याच वेळा पोलिसा पर्यंतही वाद जातात. मुंबई, पुणे, दिल्ली, आदि अनेक ठिकाणच्या मागील काही काळात घडलेल्या घटनावरुन दिसते काय आणि किती हिंसक स्वरूप असते ते.




राजकीय पक्षाच्या युवा संघटना, शाखा, आहेत. पण त्यात काही कोट्यावधी संख्येत युवकांचा सहभाग असतो. अगदीच नगण्य युवकांना कुठल्यातरी मंडळावर, सहकारी बँकेवर, जिल्हा परिषद, पंचायत समित्यावर त्यांची वर्णी लागते. त्यातही जवळचे कार्यकर्ते यांनाच संधी दिली जाते. बाकी युवक हे फक्त आधारस्तंभ असतात. त्यांना वापरून घेतले जात असते. हे आधारस्तंभ अधांतरीच असतात. त्यांच्या भवितव्याचा कुठलाही विचार त्यांच्याजवळ नसतो.

आजचा युवक इंटरनेट,मोबाईल, इन्स्टाग्राम, फेसबुक, वॉट्सप, अशा सोशल मिडियाच्या जाळ्यात नको तितका अडकला आहे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. हवा तेवढा उपयोग न घेता, नको तेवढा दुरूपयोग केला जातो. त्यामुळे फार मोठ्या प्रमाणात युवक त्यात अडकून आत्ममग्न झालाय. चुकीचे दिशेने वापर होतोय.

कलाकार, खेळाडू, सेलीब्रेटीना मोठ्या रकमेचा मोबदला देवून ऑनलाईन गेमच्या जाहिराती केल्या जातात व तरुणांना आकर्षित केले जाते. हे गेम म्हणजे एक जुगारच असतो, तरुणांना विधायक कार्याकडे ओढण्या ऐवजी हे असले प्रकार तरुण पिढीचे दिशा बदलून टाकत आहे. आणि त्यांच्याभोवती अशा गेमचा विळखा घातला गेला आहे. त्यात तरुणपिढी बरबाद होत आहे. या गोष्टीकडे गंभीर पणे बघितले गेले पाहिजे आणि अशा प्रकारांवर बंदी आणायला हवी आहे. अनेक राज्यात यावर बंदी आहे. सरकारला त्याची आवश्यकता वाटत नाही का? युवकांच्या विकासाच्या योजनांचा विचार करत असताना अशा गोष्टींकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही.

संवाद कमी होतोय. वाचन कमी झालय. काही वेळेला युवकांमध्ये वैचारिक क्षिणता आल्याचे जाणवते.

नविन तंत्रज्ञान मिळतय, सगळं जग जवळ आलय, पण माणसं हरवली आहे. मिडियाचा योग्य वापर करण्याची समज नाही... म्हणून वाटते विधायक वळण द्यायला हवे. राजकीय पक्ष तरूणांचा वापर निवडणूक कामी मोठ्या प्रमाणावर करुन घेतो.त्या बदल्यात काय मिळते? ढाब्यावर मनसोक्त जेवण,अर्थातच खाणे पिणे. महिनादोन महिने फुकट मिळते पण व्यसन कायम चिकटते. यामुळेच खुप मोठा बेरोजगार तरुण वर्ग व्यसनाधीन होऊन पुढाऱ्यांमागे धावण्यात आपली उमेदवारी वर्ष वाया घालवतोय. अनेकांचे आयुष्य दिशाहीन झाले आहे. कारण कुठले न कुठले निवडणूका असतातच. रोजगार नसलेला लाखो करोडोच्या संख्येने युवक ह्यात गुरफटला आहे. आंदोलन, मोर्चे या कामीच त्यांचा फक्त वापर वर्षानुवर्षे करुन घेतला जातोय ही गंभीर बाब आहे. त्यातच त्याच्या समाजिक जाणिवा लोप पावत आहेत. समाजातला अत्याचार, भ्रष्टाचारा बद्दल त्याला काही घेणे देणे नाही. तो पेटून उठत नाही. त्यांच्या जाणिवा बोथट झाल्या आहेत. घरातल्या घरात खूनाचे प्रकार घडताय. कुठून आली आहे ही अस्वस्थता? रोजगार नसल्याने फार मोठ्या संख्येने युवक अस्वस्थ आहे. ज्या ठिकाणी संधी उपलब्धता असते, तिथे पोहचत नाही किंवा टिकाव लागत नाही. वैचारिक क्षीणता यायला लागलीय. धुम्रपान, मद्यपानाचे आहारी जात आहे. गुटख्यावर बंदी असूनही अनेक ठिकाणी लाखोंच्या संख्येने साठा पकडला जातो. बार, पब, क्लब, मध्ये युवा पिढी गुरफटत आहे. ड्रग्ज, अमली पदार्थ सेवन वाढते आहे. त्यामुळे युवापिढी बरबाद होतेय ह्याकडे दुर्लक्ष होते आहे.

एकीकडे शेतकरी युवक वर्ग आहे. सिस्टीम मधल्या भ्रष्टाचाराने तो गांजला आहे. खते, बियाणे, ह्यातही भ्रष्टाचार, बोगस बियाणे अनेक प्रश्नांनी तो ही त्रासला आहे. अनेक वर्षा पासूनचे प्रश्न आहेतच.

वैचारिक क्षीणतेमुळे अनेक युवक आत्महत्या करताहेत.

खर तर युवाशक्तित खूप सामर्थ्य नक्कीच आहे. स्वामी विवेकानंदाचे जयंतीलाही राष्ट्रीय युवा दिवस साजरा करतो. त्यांना युवाशक्तिवर खूप विश्वास होता. युवा शब्दातच वायु म्हणजे गती आहे. त्यांना संस्कारक्षम, कणखर, राष्ट्राप्रती, समाजाप्रती प्रेम, असणारा निर्व्यसनी युवक अपेक्षित होता, आहे.

युवा दिन साजरा करतांना ह्या सर्व गोष्टींची चर्चा, सर्वक्षेत्रातील युवकांना, युवा संघटनांना व्यासपीठ उपलब्ध करुन देऊन व्हायला हवी.युवकांची मन की बात ओळखायला हवी.

शासनाने बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन द्यायला हवा आहे. नवनविन संधी प्राप्त करुन द्यायला हव्यातच. हाच त्यावर एकमेव उपाय आहे.केवळ घरी बसल्या बसल्या बेरोजगारी भत्ता देण्याची योजना न आखता, त्यांच्या हाताला काम देणे महत्त्वाचे आहे.

नाही तर, राष्ट्राची ताकद म्हणून ज्या युवकांकडे आपण पहातो,ती युवापिढी राजकारण, सोशल मिडियाचे, व्यसनाचे, फेऱ्यात बरबाद होणार हे निश्चित.

बेरोजगार, व्यसनाधीन युवकांचा देश व्हायला वेळ लागणार नाही. तशा काही युवकसंघटना चांगले कार्य करत आहेत, असतील, तरी ते खूप तोकडे आहेत.

युवा दिन साजरा करतांना शासनाने–राजकीय नेत्यांनी ह्या गोष्टी प्रामुख्याने विचारात घ्यायला हव्या. युवा शक्तिला, युवा संघटनांना विधायक वळण द्यायला हवे हे मात्र नक्की. युवक हेच देशाचे खरे भांडवल आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. आणि म्हणूनच त्यांच्या समस्या कडे त्यांना शिक्षणाप्रमाणे रोजगारसंधी मिळेल याकडे लक्ष दिल्यास, युवकही परदेशी शिक्षणाकडे आकर्षित न होता देशातच राहून आपल्या ज्ञानाचा फायदा देईल यात शंका नाही.

हा दिवस साजरा करत असताना एकूणच युवा पिढीला चांगले शिक्षण योग्य ती दिशा आणि मार्गदर्शन मिळायला हवे. प्रामुख्याने युवा पिढीच्या प्रश्नावर विचार व्हायला हवा. ठिकठिकाणी युवकांचे मेळावे आयोजित करून त्यांचे प्रश्न जाणून घेऊन ते मार्गी लावले पाहिजे. आणि राजकीय स्वार्थासाठी युवक व्यसनाधीन होणार नाही ही दक्षता घ्यायला हवी.



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

## सप्रेम..

**अडकता लफड्यात**
**म्हणा केलाय रे गेम**
**फोड खापर दुजावर**
**असून आपला ब्लेम**

**दुस–यांवरी उडो राड**
**आरोप करायचे फ्रेम**
**खोटे सराईताप्रमाणे**
**झाकाळून टाक फेम**

**दोष द्यावा उदिष्टाला**
**तो जेंव्हा चुकतो नेम**
**चुका करून आपण**
**बोले दुजास शेमशेम**

**उभा करायचाप्रसंग**
**अगदीचं सेम टू सेम**
**सध्याची वेळ भागवे**
**भले टिकेलं जेमतेम**

**शक्ती आपली दावा**
**यंत्रणेला करावे लेम**
**नुकसान भरपाई ती**
**भलीमोठी करेक्लेम**

**जनतेवरती नसोभले**
**खुर्ची वरती सार्थ प्रेम**
**पुन्हासत्ता मिळे तेंव्हा**
**आभार जाहीर सप्रेम**

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो. ९७३०३०६९९६**

# विदर्भ शिक्षण संस्था !!

**विदर्भ शिक्षण संस्था**
**भगतसिंग वार्ड, ता.देसाईगंज, जि.गडचिरोली**
Reg.No - F -२११८(गड.)
स्थापना – १९९४

विदर्भ शिक्षण संस्था ची स्थापना १९९४ मध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून ८.३.१९९४ ला करण्यात आली.

या संस्थेची स्थापना श्री.गोवर्धन कावळे आणि सौ.शुभांगी कावळे यांनी केली. ह्या संस्थेने रोजगार निर्मिती व जनतेच्या आर्थिक परिस्थिती विकास हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून जनसेवा करण्याचा निर्धार केला.

गेल्या ३० वर्षात या संस्थेने अनेक सामाजिक कार्य गडचिरोली या भागात केली संस्थेने आतापर्यंत साडेतीनशेहून अधिक महिला बचत गट, शंभरहून अधिक फार्मर्स क्लब आणि असेच अनेक लघुउद्योग स्थापन करण्यास मार्गदर्शन महिला प्रशिक्षण शिबिर जनजागृती कार्यक्रम प्रशिक्षण देऊन त्यांचे आर्थिक स्वास्थ्य वाढवले तसेच त्यांनी अनेक सामाजिक कार्य केलेले आहेत.

**संस्थेचे काही कार्य-**

१. ग्रामीण उद्योजकता विकास कार्यक्रम
२. महिला मेळावा सक्षमीकरण
३. नाबार्ड पुणे अंतर्गत ग्रामीण उद्योजकता एम ई डी पी प्रशिक्षण
४. जाणीव जागृती कार्यक्रम
५. रोजगार मेळावा

असे अनेक सामाजिक कार्य यांनी केले आहेत

संस्थेअंतर्गत सुरू असलेले उपक्रम

१. शेतकरी मंडळ स्थापन करणे
२. आर इ डी पी प्रशिक्षण राबवणे
३. बचत गट स्थापन करणे
४. एक दिवसीय प्रशिक्षण राबविणे
५. प्रदर्शनी राबविणे
६. रुलर मार्ट राबविणे
७. सेंद्रिय शेतीवर आधारित प्रकल्प राबविणे
८. विविध विषयावर जनजागृती करणे
९. स्वयंरोजगाराविषयी प्रशिक्षण

संस्थेला आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

यापुढे संस्था आपले कार्य क्षेत्र वाढवून स्वतःची एक स्वमालकीय इमारत उभी करणार आहे. ज्या अंतर्गत सर्व प्रशिक्षण वर्ग एकाच ठिकाणी चालविणार आहेत.

तसेच काही वर्षातच संस्था स्वतःचे असे एक वृद्धाश्रम एक अनाथाश्रम आणि एक विधवा महिला आश्रम असे स्थापन करून समाजाचे काही देणे लागतो याकरता कार्य करणार आहे.

ही संस्था फक्त लोकांच्या निधीतून आणि प्रशिक्षण शिबिर राबवून आपले हे ध्येय गाठणार आहे.

त्याकरता आमचे आव्हान आहे की, जास्तीत जास्त लोकांनी या संस्थेची जोडून संस्थेला हातभार लावावा हीच आमची नम्र विनंती आणि हीच आमची अपेक्षा आहे.

**– श्री.किशोर रेपाळे**
**महाराष्ट्र राज्य प्रसार प्रचार प्रमुख**
**विदर्भ शिक्षण संस्था**

# स्वातंत्र्यदिनी बुलडाण्यात ‘ऑपरेशन सिंदुर सन्मान’ महारक्तदान शिबिर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलडाणा :** राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि देशी–विदेशी लिकर असोसिएशन, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी ऑपरेशन सिंदुर सन्मान महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सहकार विद्यामंदिर हॉल, बुलडाणा येथे सकाळी ९.३० ते ५ या वेळेत होणार आहे.

या रक्तदान शिबिरात बुलढाणावासियांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे. रक्त संकलनाची जबाबदारी शासकीय रक्तपेढी बुलडाणा, शेगाव, खामगाव, लिलावती रक्तपेढी बुलडाणा, जनकल्याण रक्तपेढी नांदुरा, दत्ताजी भाले रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी अकोला या संस्थांकडे असेल. कार्यक्रमास जिल्ह्याचे मान्यवर अधिकारी उपस्थित राहणार असून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे तसेच इतर वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व संस्था प्रतिनिधी उपस्थित राहणार असून नागरिकांनी समाजसेवेचा संदेश देत महारक्तदान शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ.पराग नवलकर यांनी केले आहे.




This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## राहुल गांधी यांच्या समर्थनार्थ 'काँग्रेस' पत्रकार परिषद घेणार

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१०, शहापूर (ठाणे) :** मत चोरी हा देशाच्या लोकशाही वरील हल्ला असून या विरोधात संघटितपणे एकत्र येण्याचे आवाहन लोकसभेचे विरोधी पक्ष नेते व काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केल्यानंतर त्याला संपूर्ण देशभरात प्रचंड प्रतिसाद मिळत असून राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या मी मत चोरीच्या विरोधात या मोहिमेत ठाणे ग्रामीण जिल्हा काँग्रेस कमिटी सक्रिय सहभाग नोंदवण्यासाठी ठाणे जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दयानंद चोरघे लवकरच पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती देणार असल्याचे समजते. भारतीय निवडणूक आयोगाने भाजपला सहकार्य होण्यासाठी मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात फेरफार केला असून प्रचंड प्रमाणात बोगस मतदारांची नावे समाविष्ट केली आहेत. इंडिया आघाडीच्या बैठकीत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या मत चोरीचा भांडाफोड केला असून या मत चोरीमुळेच लोकसभेमध्ये भारतीय जनता पार्टीने मतांची चोरी करून सरकार बनवले आहे. तसेच महाराष्ट्र सह इतर राज्यातही मोठ्या प्रमाणात बोगस मतदारांची नावे समाविष्ट करून चोरीने सरकार बनवले आहे. या विरोधात राहुल गांधी यांनी आवाज उठवला असून मी मतचोरीच्या विरोधात ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत ठाणे ग्रामीण जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात राहुल गांधी यांना समर्थन देण्यासाठी जिल्ह्यात प्रत्येक ब्लॉक स्तरावर ही मोहीम राबविण्यात येणार असल्याचे दयानंद चोरघे यांनी सांगितले असून याबाबत अधिक माहिती देण्यासाठी लवकरच पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात येणार असल्याचे दयानंद चोरघे यांनी कळविले आहे.

# हर हर महादेव...! तिसऱ्या श्रावणी सोमवारी ढोकेश्वरला भाविकांची मांदियाळी

## महाराष्ट्राच्या विविध भागातून भाविक ढोकेश्वर चरणी...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तिसरा श्रावणी सोमवार असल्याने पुरातन पांडवकालीन लेणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री ढोकेश्वरला हजारो भाविकांची मांदियाळी पाहायला मिळाली. पहाटे ३ वाजता ढोकेश्वर मंदिरातील पिंडीला दही, दुध असा महाजलाभिषेक करून पुजा करुन म हाआरती करण्यात आली. यानंतर डम रू व शंखनाद करत गोसावी कुटुंबाच्या वतीने विधिवत साज चढवला. पहाटेपासूनच भाविकांना दर्शनासाठी ढोकेश्वर मंदिर खुले करून देण्यात आले.

त्यामुळे भाविकांनी ढोकेश्वर महाराज शींचे दर्शन घेऊन मंदिर प्रदक्षिणेचा मार्ग भाविकांनी हर हर महादेव, बम बम भोलेच्या घोषणांनी



मंदिर परिसर दणाणून सोडला होता. टाकळी ढोकेश्वर (ढोकी) येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या श्रावणी सोमवारी हजारोंच्या संख्येने भाविक दाखल होतात. त्यामुळे ढोकेश्वरला श्रावण महिन्यात विशेष महत्त्व असते. श्रावण महिना सुरू झाल्यापासून दररोज शेकडो भाविकांची श्री क्षेत्र ढोकेश्वर येथे गर्दी पाहायला मिळाली. ह्या तीन दिवसांम ध्ये हजारो भाविकांनी पवित्र अशा पिंडीचे दर्शन घेतले. या श्रावणमासात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावर्षी पाऊसमान चांगला असल्याने यात्रेमध्ये विविध खेळणी, पाळणाघरे, खाऊची दुकाने, संसारोपयोगी वस्ती खरेदी करण्यासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. तिसऱ्या श्रावणी सोमवार व त्याम ध्ये रक्षाबंधन हा सण जोडून आल्यामुळे दिवसभर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्तांनी तसेच पाहुणेरावळ्यांनी हजेरी लावली होती. यात्रेनिमित्त ढोकी ग्रामस्थांच्या वतीने जंगी हगामा भरविण्यात आला होता. कुस्त्यांच्या आखाड्याने श्री ढोकेश्वर महाराजांच्या यात्रेची सांगता झाली.

**तब्बल २१ क्विंटल साबुदाणा खिचडीचा महाप्रसाद**

श्री ढोकेश्वर यात्रेनिमित्त भाविकांसाठी टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी विशाल भंडाऱ्याच्या माध्यमातून २१ क्विंटल साबुदाणा खिचडी महाप्रसादाचे वाटपाचे आयोजन केले होते. श्रावणी सोमवार यात्रेनिमित्त ढोकेश्वरचे दर्शन झाल्यानंतर अनेक भाविकांनी ढोकेश्वर खिचडी महाप्रसादाचा लाभ घेतला. ढोकेश्वरच्या साबुदाणा खिचडीचे एक वेगळेच वैशिष्ट्य आहे. यादिवशीचा प्रसाद हा भाविकांसाठी पर्वणी आहे. दिवसभर हजारोंच्या संख्येने भाविकांनी पोटभर खिचडीचा प्रसाद देताना टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने उत्कृष्ट नियोजन व आयोजन पाहून अनेकांनी या ढोकेश्वर विशाल भंडारा कमेटीला धन्यवाद दिले.

## दैनिक अक्षराज चे पत्रकार वसंत रांधवण यांना आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर



**अक्षराज : राजकुमार ईकडे**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी पारनेर चे भूमिपुत्र व दैनिक अक्षराज चे अहिल्यानगर जिल्हा प्रतिनिधी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष वसंत भानुदास रांधवण यांची राज्यातील अक्षराज मीडिया समूह यांच्यावतीने दिला जाणारा आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ करिता नुकतीच निवड करण्यात आली असल्याचे अक्षराज मिडिया समुहाचे मुख्य संपादक विनोद गोरे व सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण - गोरे यांनी वसंत भानुदास रांधवण यांना निवडीचे पत्र देऊन कळविले आहे. गुरूवार, दि.१४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता आळंदी देवाची (पुणे) या ठिकाणी विविध क्षेत्रातील नाम वंत लेखक व कवी आणि मान्यवरांच्या हस्ते दैनिक अक्षराज वर्धापनदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार सोहळ्यात आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ देऊन वसंत रांधवण यांना सन्मानित करण्यात येणार आहे. पत्रकारिता क्षेत्रात गेल्या काही वर्षातील सातत्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल आम्ही अक्षराज मिडिया समुहाकडून वसंत रांधवण यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला असल्याचे मुख्य संपादक विनोद गोरे यांनी सांगितले. दैनिक अक्षराज समाजातील मानबिंदू असलेल्या चिखली, ता.चिखली जिल्हा बुलडाणा येथून प्रकाशित होत असलेले भारत सरकार नोंदणीकृत असलेले अक्षराज मिडियाने आपला वेगळा ठसा उमटविला आहे. दरवर्षी पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांना वर्धापनदिनाच्या दिवशी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात येते असल्याचे गोरे यांनी सांगितले.हा पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल जिल्ह्यासह पारनेर तालुक्यातील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष संतोष तांबे, तालुका सचिव संतोष कोरडे गंगाधर धावडे, शिवशंकर शिंदे यासह जिल्ह्यातील पत्रकारांनी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी वसंत रांधवण यांचे अभिनंदन केले आहे.

# निवडणूक आयोगाविरोधात दिल्लीत काढलेल्या मोर्चात बीडचे खा.सोनवणे आघाडीवर

## महाराष्ट्रात मतदानाच्या आदल्यादिवशी मतदार यादीत नावे सामाविष्ठ केली - खा.सोनवणे




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.११, बीड :** मतचोरी प्रकरणी दि.११ ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत काढलेला मोर्चा दिल्ली पोलीसांनी अडवला. दरम्यान, या खासदारांमध्ये देशाचे नेते शरद पवार, राहुल गांधी, खा.सुप्रिया सुळे यांच्या खांद्याला खांदा लावून बीडचे खा.बजरंग सोनवणे आघाडीवर होते. यावेळी त्यांनी म हाराष्ट्रात देखील मतदानाच्या आदल्या दिवशी मतदार यादीत नावे, समाविष्ठ केली जात होती, असा खळबळजनक आरोप केला. इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यास सुरुवात केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अडवला. खासदारांनी हातामध्ये 'सेव्ह व्होट'चे बॅनर घेतले होते. तथापि, दिल्ली पोलिसांनी सांगितले होते की इंडिया आघाडीने या मोर्चासाठी कोणतीही परवानगी घेतली नाही. बिहारमधील मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली ३०० विरोधी खासदारांनी दिल्लीत पायी मोर्चा काढला आहे.

या मोर्चात बीडचे खासदार बजरंग सोनवणे आघाडीवर होते. तर संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचा १६ वा दिवस असून लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधी खासदारांनी गोंधळ सुरू केला. खासदारांनी 'वुई वॉन्ट जस्टिस'च्या घोषणा देत सभागृहाच्या वेलमध्ये पोहोचले. यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभा दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केली. लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू असताना विरोधकांनी 'आम्हाला न्याय हवा आहे' अशा घोषणा दिल्या. यावेळी म ाध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, इंडिया आघाडीचा मोर्चा निवडणूक आयोगावर आहे. मात्र, याआधी पोलीस बळाचा वापर करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाला राहुल गांधींवर बोलण्याचा अधिकार नसून कायदा हा निवडणूक आयोगाच्या घरचा नाही. त्यांनी भाजपसाठी काम करणे सोडावे. निवडणूक आयोग भाजपची बी टिम असल्याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

> लोकशाही टिकवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी इंडिया आघाडी एकत्र उभी आहे. ही लढाई लोकशाही वाचविण्यासाठी असून आम्ही ती शेवटपर्यंत लढणार आहोत.
> **- खा.बजरंग सोनवणे, बीड**

## अखेर तो शिवरस्ता झाला मोकळा; १४ शेतकऱ्यांचा प्रश्न मिटला



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, पोंभूर्णा (चंद्रपूर) :** तालुक्यातील चेक हत्तीबोडी व देवाडा (खुर्द) ची हद्द सांगणारा शिवरस्ता मागील २० वर्षापासून अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेला होता. अतिक्रमणात अडकलेल्या शिवरस्त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतीपुरक कामे करण्यास व ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत होता.

पावसाळ्यात चिखल तुडवत जावे लागत होते. सदर शिवरस्ता खुला करून देण्यासाठी शेतकऱ्यांनी अनेकदा निवेदने दिले मात्र, रस्त्याचा प्रश्न काही मार्गी लागत नव्हता. अखेर तहसिलदार शेलवटकर यांनी शेतकऱ्यांना विश्वासात घेत सदर शिवरस्ता मोकळा करून दिला. त्यामुळे त्या चौदा शेतकऱ्यांचा प्रश्न मिटला असून शेतीपुरक कामे व ये-जा करण्यास मोठा दिलासा मिळाला आहे.

शिवरस्ता, शेतरस्ते, पांदण रस्ते शेतीला पुरक असतात. शेतकऱ्यांच्या समृद्धीचा म ार्ग असतात. शेतीपुरक कामे करणे व पिकवलेल्या पिकाला घरी व परिणामी बाजारपेठेत नेण्यासाठी महत्त्वाचा असतो. पण अनेकदा अरुंद रस्त्यावर अतिक्रमण केले जाते. गाव नकाशानुसार अतिक्रमीत आणि बंद असलेले शिवरस्ते, शेतरस्ते, पांदण रस्ते मोकळे करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या होत्या. पोंभूर्णा तहसीलदार यांनी पोंभूर्णा तालुक्यातील तक्रार प्राप्त झालेले शिवरस्ते, शेतरस्ते व पांदण रस्ते मोकळे करून देण्याची विशेष मोहीम दिनांक ६ व ७ ऑगस्टला राबवण्यात आली. २० वर्षापासून अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेल्या चेक हत्तीबोडी व देवाडा (खुर्द) ची हद्द असलेला शिवरस्ता तहसिलदार मोहनिश शेलवटकर यांनी प्राथमिकता देत मोकळा करून दिल्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. यावेळी तहसीलदार मोहनिश शेलवटकर, नायब तहसीलदार रामकृष्ण उईके, दिपाली आत्राम, मंडळ अधिकारी दिनकर शेडमाके, तलाठी जनार्धन बल्की, धनलाल भोयर, किशोर भोयर, आरती धुर्वे, वृषभ तेलसे, श्रीधर तिवाडे व महसूल विभागाचे अधिकारी यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली.

# रामाळा तलाव स्वच्छता मोहिमेला गती

## तलाव संवर्धनासाठी आ. जोरगेवार यांचे प्रयत्न, पाहणी करुन अधिक कार्यक्षमतेच्या सूचना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपुर :** रामाळा तलाव सौंदर्यीकरण आणि संरक्षण यासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सदर निधीतून घेण्यात आलेल्या तरंगत्या यंत्राच्या माध्यमातून रामाळा तलाव स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे. सदर कामाची आज सोमवारी आ. किशोर जोरगेवार यांनी पाहणी करत अधिकाऱ्यांना सुचना केल्या आहे. सदर मशिनरी रामाळा तलाव स्वच्छतेत उपयुक्त ठरणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

यावेळी उपायुक्त चिद्रावार, यांत्रिकी सहायक अभियंता चोरे, पाण्यापूरवठा कनिष्ठ अभियंता चोरे, महानगराध्यक्ष सुभाष कासनगोट्टुवार, विधानसभा प्रमुख दशरथ ठाकूर, म हामंत्री रवी गुरनुले, युवा मोर्चा अध्यक्ष मयूर हेपट, मंडळ अध्यक्ष सुभाष अदम ने, संजीव सिंग, राकेश बोमनवार, तेजा सिंग, सुबोध चिकटे, नितेश गवळी,



आदींची उपस्थिती होती. आ. किशोर जोरगेवार यांच्या सूचनेनंतर शहराच्या मध्यवर्ती भागातील ऐतिहासिक व निसर्गरम्य रामाळा तलावाची स्वच्छता आणि पुनरुज्जीवन करण्यासाठी चंद्रपूर महानगरपालिकेने मोठा उपक्रम हाती घेतला आहे. अनेक वर्षांपासून तलावाच्या पृष्ठभागावर पसरलेल्या इकोर्निया या जल वनस्पतींमुळे तलावातील पाण्याचा प्रवाह, जलजीवन व सौंदर्य या तिन्ही गोष्टींवर प्रतिकूल परिणाम होत होता. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून आता विशेष यांत्रिक साधनांची मदत घेतली जात आहे.आ. किशोर जोरगेवार यांनी मंजूर केलेल्या निधीतून महानगरपालिकेच्या वतीने आणण्यात आलेल्या या अत्याधुनिक यंत्राद्वारे ईकोर्निया वनस्पतींचे मोठ्या प्रमाणावर उच्चाटन सुरू आहे. मशीन पाण्यात तरंगत राहून थेट पृष्ठभागावरील व मुळांसकट वनस्पती गोळा करून बाहेर काढते.

यामुळे स्वच्छतेचे प्रमाण व गती दोन्ही वाढले असून, अल्पावधीतच तलाव वनस्पतीमुक्त होण्याच्या मार्गावर आहे. आज आ. किशोर जोरगेवार यांनी रामाळा तलावावर भेट देऊन सुरू असलेल्या कामाची सखोल पाहणी केली. मशीनरीची कार्यपद्धती, कामाचा वेग आणि स्वच्छतेचा परिणाम याची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली. यावेळी ते म्हणाले, रामाळा तलाव हे फक्त जलस्रोत नसून चंद्रपूर शहराची ओळख आहे. या तलावाचे संरक्षण, संवर्धन आणि सौंदर्यवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छतेनंतर ही सातत्याने देखभाल केली तरच हे कार्य दीर्घकाळ टिकेल असे ते म्हणाले. आ. जोरगेवार यांनी काम अधिक वेगाने आणि कार्यक्षम तेने पार पाडण्यासाठी तसेच साफ केलेल्या वनस्पतींचे योग्य व्यवस्थापन करण्याबाबतही अधिकाऱ्यांना सूचना केल्या. या मोहिमेमुळे तलावातील पाणी प्रवाह सुधारेल, ऑक्सिजनचे प्रम ाण वाढेल, पाण्यातील जैवविविधतेला चालना मिळेल आणि तलाव परिसर पुन्हा एकदा नागरिकांसाठी स्वच्छ, निसर्गरम्य ठिकाण म्हणून उजळून निघेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# 'आपलं मंत्रालय' विशेषांकाचे प्रकाशन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, मुंबई :** शासन, समाज आणि व्यक्ती यांच्यातील सुसंवाद दृढ करण्यासाठी तसेच विचारप्रवृत्त व माहितीपूर्ण लेखन वाचकांसमोर आणण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आपलं मंत्रालय या गृहपत्रिकेचा विशेषांक मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या हस्ते प्रकाशित झाला. या प्रकाशन सोहळ्यास सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. विशेषांकात भारतातील प्राचीन रंगांचा इतिहास, शालेय शिक्षण विभाग व माननीय न्यायालय यांचा परस्पर संबंध यांसारखे सखोल व ज्ञानवर्धक लेख समाविष्ट आहेत. शासनाच्या कार्याचे संवेदनशील व मानवी रूप वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा आणि सकारात्मक संवादाची नवी दिशा देण्याचा प्रयत्न या अंकातून करण्यात आला आहे. आपलं मंत्रालय या उपक्रमातून वाचक, समाज आणि शासन यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व बळकट होईल, असा विश्वास डॉ.कुलकर्णी यांनी व्यक्त केला. हा विशेषांक https://publuu.com/flip-book/945595/2075357 या लिंकवर वाचनासाठी मोफत उपलब्ध आहे.

# दि पाटण अर्बन बँकेची वार्षिक सभा आज : बाळासाहेब राजेमहाडिक

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.११, पाटण (सातारा) :** दि पाटण अर्बन को-ऑप बँक लि.पाटण बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी एक वाजता श्रीराम मंदिर पाटण येथे बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब राजेमहाडिक यांच्या अध्यक्षतेखाली व माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, भारतीय जनता पक्षाचे युवा नेते सत्यजितसिंह पाटणकर त्यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. याची माहिती दि पाटण अर्बन बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब राजेमहाडिक यांनी दि पाटण अर्बन बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी पाटण अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माधवरा कपिलेश्वर, पाटण अर्बन बँकेचे व्यवस्थापक के.आर शिंदे उपस्थित होते.



पाटण अर्बन बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब राजेमहाडिक पुढे म्हणाले, आपल्या बँकेची आर्थिक व व्यावसायिक स्थिती अधिकाधिक सुधारत असल्याचे समाधान वाटत आहे. या आधी अडचणीच्या काळात देखील बँकेने आपली सेवाभावी वृत्ती कायम ठेवून ग्राहकांच्या गरजा व अडचणी लक्षात घेऊन तसेच रिझर्व बँकेच्या नियमांची काटेकोर अमलबजावणी, सहकार खात्याचे तंतोतत पालन तसेच ग्राहक सेवा हे केंद्रबिंदू मानून दिलेल्या तत्पर सेवा, पारदर्शक कारभार, संचालक मंडळ व सेवक वर्ग या मधील सुसंवाद त्याचबरोबर बँकेचे संस्थापक अध्यक्ष विक्रमसिंह पाटणकर, माजी मंत्री सार्वजनिक बांधकाम व भारतीय जनता पार्टीचे युवा नेते सातारा जिल्हा बँकेचे संचालक, सत्यजितसिंह पाटणकर यांचे बहुमूल्य मार्गदर्शन, आर्थिक शिस्त, व्यवहारिक व आर्थिक दृष्टिकोन या सर्वच बाबीवर बँकेची सन २०२४, २०२५ या आर्थिक वर्षात.

बँकेने ३०० कोटीचा व्यवसाय केला आहे. बँकेने नेत्रदिपक कामगिरी केलेली आहे.बँकेने गेल्या आर्थिक वर्षात तांत्रिक बाबी यावर विशेष भर दिलेला आहे. तसेच बँकिंग क्षेत्रात होत असलेले कमालीचे बदल लक्षात घेऊन मनुष्यबळ विकासाच्या दृष्टीने सर्वकष प्रशिक्षण या बाबीस बँकेने कमालीचे महत्व दिलेले आहे. अहवाल वर्षात बँकेने आवश्यक तेव्हा आवश्यक त्या विषयावर संबंधित संचालक, अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केलेली आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या निकषानुसार सीआरएआर चे प्रमाण ९ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. आपल्या बँकेचा सीआरएआर १६.७० टक्के इतका आहे.

भारतीय रिझर्व बँकेने सीआरएआर संदर्भात वेळोवेळी निर्धारित केलेल्या मर्यादिचे बँकेने ततोतत पालन केलेले आहे. सहकार कायदा व भारतीय रिझर्व बँकेच्या वेळोवेळी मार्गदर्शन तत्त्वाचे पालन करीत बँकेने मार्गक्रमण केलेले आहे. बँकिंग क्षेत्रात प्रगती बाबत नवनवीन अत्याधुनिक सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देण्यासाठी बँक नेहमीच अग्रेसर असते.

यामध्ये एटीएम, पॉस मशीनद्वारे सेवा, डिजिटल सातबारा सुविधा तसेच शासकीय अनुदान थेट खात्यावर उपलब्ध करून देणे इत्यादी सेवा आम्ही देत आहोत. त्याचप्रमाणे आपल्या बँकेच्या या सालात कर्जासाठी किमान व्याजदर, कर्ज वितरण सुलभ पद्धत, अत्यल्प छाननी शुल्क, ईएमआय सुविधा व दैनंदिन शिल्लक ठेवीवर व्याज देणे अशा विविध विषय आपण करत आहोत.

बँकेच्या एटीएम व पॉस मशीन सुविधा द्वारे. मिळणारा भरघोस प्रतिसाद पाहता येणाऱ्या आर्थिक वर्षांमध्ये आणखी ४ एटीएम व अधिकाधिक ग्राहकाना पास मशीन सुविधा आम्ही पुरवणार आहोत. तसेच पुढील महिन्यापासून खाते सुरू करणाऱ्या प्रत्येक खातेदारास आम्ही एटीएम कार्डचा पुरवठा करण्याचा मानस आहे. आता पर्यंत १० हजार एटीएम कार्ड ग्राहकांना वितरण केली आहेत.

तसेच आरटीजीएस, एनईएफटी, पीओएस एटीएम याचबरोबर आय.एम.पी.एस ची ही सुविधा लवकरच उपलब्ध करून देणार आहोत. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड मुंबई, स्टेट महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड मुंबई, स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा पाटण, कराड, सातारा, बँक ऑफ महाराष्ट्र शाखा पाटण, सातारा, दि सातारा जिल्हा वस् मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड शाखा पाटण, कराड, शिवाजीनगर सातारा, मल्हारपेठ, ढेबेवाडी, कराड, मलकापूर, उंब्रज, तारळे, कॅम्प सातारा, एचडीएफसी बँक शाखा कराड, सातारा, आयडीबीआय बँक शाखा कराड व उंब्रज, सारस्वत बँक शाखा कराड, रत्नाकर बँक लि.शाखा कराड व सांगली, शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.शाखा कराड, ठाणे जनता सह. बँक लि.शाखा कराड, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक शाखा कराड, या बँकेशी सभासदांचे पैसे ट्रान्सफर करण्याची सुविधा असल्यामुळे सभासदांना याचा नक्कीच फायदा होणार आहे.

# आदिवासी समाज म्हणजे सात्विकता, पराक्रम आणि परिश्रमाचे प्रतीक - आ.मुनगंटीवार

## पोंभूर्णा येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त आयोजित सोहळा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** आदिवासी समाज हा केवळ आपल्या सात्विक जीवनशैलीसाठीच नव्हे, तर पराक्रम आणि अथक परिश्रमासाठी ही ओळखला जातो. निसर्गाशी एकरूप होऊन जगणारा, परंपरा, संस्कार आणि निष्ठा जपणारा हा समाज देशाच्या विकास प्रवासात मोलाचा वाटा उचलतो. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नेतृत्वातून आदिवासी भगिनींना आणि समाजाला मिळालेला आत्मविश्वास हा अभिमानाचा विषय आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी जागतिक आदिवासी दिवसानिमित्त पोंभूर्णा येथे आयोजित कार्यक्रमात केले. जागतिक आदिवासी दिवसानिमित्त पोंभूर्णा येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी गोंडवाना आंदोलन आदिवासी चळवळीचे जिल्हाप्रमुख जगन येलके, प्रदेश महामंत्री अल्काताई आत्राम, सचिव हरी कोडापे, महिला अध्यक्षा उषाताई आलाम, महादेव मडावी, कवडू मडावी, कांता मडावी, गीताताई कुळमेथे, गीताताई कोवे, भीमराव मरसकोल्हे, सामाजिक कार्यकर्ता गणेश परचाके तसेच समाजाच्या महिला व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आ. मुनगंटीवार यांनी आदिवासी बांधवांशी संवाद साधत आपला आनंद व्यक्त केला. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी एवरेस्ट शिखर केले, ही शक्ती त्यांच्या अंगी जन्मजात आहे.



योग्य संधी मिळाल्यास हेच विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात जागतिक पातळीवर झेंडा फडकवू शकतात.

आदिवासी समाजासाठी राबवल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे त्यांच्या प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवून, त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणे हीच खरी प्रगती असेल, असेही आ. मुनगंटीवार म्हणाले. कष्टकरी व पराक्रमी आदिवासी समाजाच्या कल्याण, विकास आणि हक्कांच्या रक्षणासाठी सदैव खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमात आदिवासी भगिनींनी आ. मुनगंटीवार यांना राखी बांधून आपुलकीचा मान व्यक्त केला आणि रक्षाबंधनाचा पवित्र सोहळा उत्साहात साजरा झाला.

# आदिवासी दिन सांस्कृतिक अभिमानाचा दिवस : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** जागतिक आदिवासी दिन हा दिवस केवळ उत्सवाचा नसून, आपल्या आदिवासी समाजाच्या शौर्य, परंपरा, संस्कृती आणि योगदानाची आठवण करुन देणारा प्रेरणादायी क्षण आहे. येथे सौंदर्यीकरणाच्या कामाचे भूमीपूजन होत आहे.

आदिवासी समाज हा आपल्या भारताच्या आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा एक तेजस्वी भाग असून जागतिक आदिवासी दिन हा सांस्कृतिक अभिमानाचा दिवस असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. चंद्रपुरातील जलनगर वार्ड येथे जागतिक आदिवासी दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी येथील सौंदर्यीकरणाच्या कामाचे ही आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महिला शहर अध्यक्षा छबू वैरागडे, माजी नगरसेविका शीतल आत्राम, पुष्पा उराडे, राकेश बोमनवार, अनिल सुरपाम, किसन सुरपाम, आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले की, आदिवासी समाजाची लोकपरंपरा, नृत्य, गाणी, सण-उत्सव हे केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून, ते निसर्गाशी असलेल्या त्याच्या घट्ट नात्याचे प्रतिक आहे. जगाला पर्यावरण संवर्धन, सुसंवाद आणि सहजीवनाचा संदेश देणारी ही जीवनशैली आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आजच्या आधुनिक



युगात विकासाच्या वाटचालीसोबत आपल्या आदिवासी संस्कृतीचे संवर्धन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या पिढ्यांनी जपलेल्या परंपरा, गाणी, वेशभूषा आणि कला या पुढच्या पिढ्या पर्यंत पोहोचल्या पाहिजेत. त्यासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य या क्षेत्रात प्रगती साधताना सांस्कृतिक मुळांचा सन्मान राखणे अत्यंत गरजेचे आहे. जलनगर वार्डात आदिवासी समाज मेळावा आयोजित करुन आपल्या परंपरांचा उत्सव साजरा करण्यात आला. शालेय मुलांनी पारंपारिक वेशभूषेत सादर केलेले नृत्य आपली सांस्कृतिक ओळख अधिक ठळकपणे समोर आणणारे होते. तसेच सौदर्यीकरण विकास कॉचे भूमिपूजन करुन आपण सामाजिक आणि भौतिक विकासाच्या दिशेनेही एक महत्वाचे पाऊल टाकले आहे, असे ते म्हणाले.

# विंचूर येथील पाताळेश्वर महादेव मंदिर येथे महाआरती व भंडारा

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील पाताळेश्वर महादेव मंदिरात तिसऱ्या श्रावणी सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ रोजी भव्य महाआरती व भंडारा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री पाताळेश्वर भक्त मंडळ व ग्रामस्थ, विंचूर पंचक्रोशी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत पाताळेश्वर महिला भजन मंडळ यांच्या सुमधुर भजन कार्यक्रमाने वातावरण



भक्तिमय झाले. त्यानंतर सायं.६ वाजता महाआरती करण्यात आली व महाआरतीनंतर आलेल्या भाविकांनी तात्काळ महाप्रसादाचा लाभ घेतला. गुरुभक्ती, शिवभक्ती, नाथ भक्त मंडळ आणि सामूहिक सहभाग या भावनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

परिसरातील नागरिक, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# थोडक्यात

## जिल्हाभरात २११४ जणांनी घेतली अवयवदानाची प्रतिज्ञा

### प्रभारी जिल्हाधिकारी, सीईओंनी घेतला अवयवदानाचा निर्णय; बैठकीतच केली ऑनलाईन नोंदणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.११, चंद्रपूर :** शासनाच्या सुचनेनुसार संपूर्ण राज्यात ३ ते १३ ऑगस्ट २०२५ या कालावधीत अवयवदान जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. अवयवदान ही आजच्या काळातील सर्वात मोठी मानवसेवा असून ती अनेकांना जीवनदान देऊ शकते. याच संकल्पनेनुसार जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित बैठकीत प्रभारी जिल्हाधिकारी डॉ.नितीन व्यवहारे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांनी ऑनलाईन नोंदणी करून अवयवदानाचा निर्णय घेतला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, मा.सां. कन्नमवार शास. वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.मिलिंद कांबळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.हेमचंद कन्नाके आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. व्यवहारे म्हणाले, अवयवदानाबाबत जास्तीत जास्त लोकांना माहिती द्यावी. या मोहिमेदरम्यान अवयवदानाविषयी गैरसमज दूर करण्यात येणार आहे. आपण असतांना आणि नसतांनाही समाजाच्या उपयोगी पडू शकतो. ज्यांना अवयवदान करण्याची इच्छा आहे, त्यांनी आरोग्य विभागाची संपर्क करावा. तसेच आपले नातेवाईक व आजुबाजूच्या लोकांना अवयवदानाविषयी प्रवृत्त करावे, असे आवाहन ही त्यांनी केले. यावेळी उपस्थितांना अवयवदानाची शपथ देण्यात आली. जिल्हाभरात या मोहिमेदरम्यान आतापर्यंत २११४ अवयवदानाची ऑनलाईन प्रतिज्ञा घेतली आहे. यात जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातर्फे १६५९ तर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे ४५५ जणांचा समावेश आहे. अवयवदानाची पात्रता सर्व वयोगटातील निरोगी व्यक्ती अवयवदान करू शकतात.

ब्रेन स्टेम, तीव्र हृदयविकाराचा झटका तसेच अकस्मिक कारणाने झालेला मृत्यु, इत्यादी कारणाने मृत्यु झालेल्या व्यक्तीचे अवयवदान करता येते. ज्या व्यक्तिंचा मृत्यु हा रेबीज, एचआयव्ही, हिपॅटॉयटीस, बुडून मृत्यु होणे, कर्करोग व सेप्टीक व्यक्तींचे अवयवदान करता येत नाही. अवयवदान करण्याची इच्छा असल्यास एखाद्या व्यक्तीस मृत्युनंतर आपल्या अवयवांचे दान करण्याची इच्छा असल्यास त्यांनी कायद्यानुसार संमतीपत्र भरणे आवश्यक आहे. तसेच संमतीपत्रावर एखाद्या जवळच्या नातेवाईकाची सही सुध्दा आवश्यक आहे. हा फॉर्म भरल्यानंतर त्या व्यक्तीस डोनर कार्ड दिले जाईल. जरी डोनर कॉर्डवर सही असली तरी मृत्युनंतर आपल्या जवळच्या नातेवाईकाच्या संमतीशिवाय अवयव दान होऊ शकत नाही. त्यामुळे आपल्या इच्छेविषयी नातेवाईकांना माहिति असणे आवश्यक आहे. येथे भरा अवयवदानाचे संमतीपत्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार एचटीटीपीएस://एनओटीटीओडॉटएबीडीएमडॉटजीओव्हीडॉटइन या संकेतस्थळावर अवयवदानाची संमती देऊन आपण प्रमाणपत्र प्राप्त करून घेऊ शकतो.

## पारनेर तालुक्यातील सुपा या ठिकाणी विमानतळ उभारा

### खासदार लंके यांची केंद्र सरकारकडे मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.११, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील सुपा येथे स्वतंत्र ग्रीनफिल्ड विमानतळ उभारण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी नागरी उड्डयन मंत्री किंजारापू नायडू यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. सुपा विमानतळाची तात्काळ उभारणी शक्य नसल्यास शिर्डी विमानतळाचा विस्तार करून सुपा परिसराशी जोडणी करण्याचा प्रस्तावही खा. लंके यांनी ठेवला आहे. खा. लंके यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सुपा हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे औद्योगिक आणि व्यापारिक केंद्र आहे. सुपा एमआयडीसीसह अहमदनगर तसेच पुणे जिल्ह्यातील कारेगांव व रांजणगांव औद्योगिक वसाहती या परिसरात आहेत.

या वसाहतींमध्ये अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी मोठया प्रमाणावर गुंतवणूक केलेली आहे. मात्र विमान सेवा उपलब्ध नसल्याने उद्योगांचे दळणवळण, व्यापार, लॉजिस्टिक्स आणि वेळेचे नियोजन या सर्व गोष्टी अडचणीत येतात असे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे. विमानतळाची सुविधा निर्माण झाल्यास सुपा आणि संलग्न परिसर हा एक मोठा औद्योगिक क्लस्टर बनू शकतो. विमानसेवा उपलब्ध झाल्यास गुंतवणूकदारांचा विश्वास वाढेल आणि स्थानिक रोजगार संधीही मोठया प्रमाणावर उपलब्ध होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील उत्पादन मोठया प्रमाणावर पुणे, मुंबई आणि इतर शहरांमध्येही पाठवले जाते. विमानतळामुळे वाहतूक खर्चात घट होऊन उद्योगधंद्यांना मोठा फायदा होईल. विशेषतः निर्यातक्षम वस्तूंच्या दृष्टीने ही सुविधा अत्यंत फायदेशीर ठरेल. अहिल्यानगर जिल्हा हे धार्मिक पर्यटनासाठी ओळखले जाणारे ठिकाण आहे. शिर्डी, शनिशिंगणापूर, भिंगार गावाजवळील किल्ला, अष्टविनायक मंदिरांना भेटी देण्यासाठी देश विदेशातून लाखो पर्यटक दरवर्षी भेट देतात.

विमानतळामुळे त्यांच्या प्रवासात मोठी सुलभता निर्माण होईल व पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल. विमानतळाच्या मागणीवर केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा असे आवाहन खासदार निलेश लंके यांनी मंती किंजापूर नायडू यांच्या भेटी दरम्यान केले. त्यांनी स्पष्टपणे नमूद केले की, हा निर्णय केवळ सुपा नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्हा आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.